# पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड
## पोलीस उप आयुक्त (गुन्हे)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

# प्रेसनोट दि.२४/०६/२०२४

**तळेगाव दाभाडे परीसरात अंधाधुंद गोळीबार करणाऱ्या गुंडाच्या गुंडा विरोधी पथकाने नाशिक येथे आवळल्या मुसक्या एकुण ०७ गावठी पिस्तुले व १४ जिवंत काडतुसे केली हस्तगत.**

पहीली कारवाई :- दि.२०/०६/२०२४ रोजी रात्रौ ०८:१० वा. ते ०८:३० वा. चे दरम्यान गजानन महाराज चौक ते राजेंद्र चौक दरम्यान तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पुणे येथे तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन रेकॉर्डवरील आरोपी नामे रोहन ऊर्फ चिक्या उत्तम शिंदे, विकी खराडे व त्यांचे अनोळखी ०४ साथीदारांनी मोटार सायकलींवर येवून "आम्ही इथले भाई आहोत, आमच्या नादाला कोणी लागायच नाही" असे मोठमोठयाने बोलुन शिवीगाळ करुन त्यांचे हातातील पिस्तुलाने गोळीबार करीत लिंबफाटयाचे दिशने निघुन गेले म्हणुन, तळेगाव दाभाडे पोलीस ठाणेचे पोलीस आनंद तुकारात मोहीते यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा नोंद क्र. ३२०/२०२४ भारतीय दंड विधान कलम ३०८,१४३,१४४,१४७,१४८,१४९,भारतीय हत्यार कायदा क. ३(२५)(२७),महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५, क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

मा. वरिष्ठांच्या आदेशाने गुन्हे शाखेचे युनिट व ब्रॅन्च तसेच तळेगाव दाभाडे पोलीस ठाणेकडील तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार हे दाखल गुन्हयाचा समांतर तपास यातील आरोपींचा शोध घेत असताना गुंडा विरोधी पथकातील सहा.फौज. प्रविण तापकिर व पो.हवा.१६०४ चौधरी यांना मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे गुंडा विरोधी पथकातील अधिकारी पोउपनि जगताप व अंमलदार यांनी सदर ठिकाणी जावुन दाखल गुन्हयातील आरोपी १) रोहन ऊर्फ चिकया उत्तम शिंदे वय १८ वर्षे, रा. आयुषपार्क इमारत, फलॅट नं. १३०१, कातवे रोड, तळेगाव दाभाडे, पुणे २) निरज ऊर्फ दादया बाबू पवार, वय १९ वर्षे, रा. प्रियदर्शनी शाळेसमोर, वाघीरे वाडा, नेहरुनगर पिंपरी पुणे ३) आदित्य नितीन भोईनल्लू वय २१ वर्षे, रा. कामाठीपुरा, हनुमान मंदीराशेजारी, ता. शिरुर जि. पुणे यांना ताब्यात घेवून तळेगाव दाभाडे पोलीस ठाणेच्या ताब्यात पुढील तपासकामी दिले असून आरोपींना मा. प्रथमवर्ग न्यास दंडाधिकारी सो. वडगाव न्यायालय, ता. मावळ जि. पुणे यांचे न्यायालयात हजर करुन त्यांची तपासकामी दि.२७/०६/२०२४ रोजी पर्यंत ०७ दिवस पोलीस कस्टडीची रिमांड घेण्यात आली असून अटक आरोपींकडुन तपासामध्ये एकुण ०३ गावठी पिस्तुले व ०८ जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली आहेत.

सदर आरोपी गुंडा विरोधी पथकाचे ताब्यात असताना त्यांचेकडे तपास करता मिळालेल्या माहीतीनुसार आणखी काही अवैध शस्त्रे परीसरात असलेबाबत गोपनिय माहीती प्राप्त झाली, त्या अनुषंघाने पो.उ.नि.अशोक जगताप व पो.उ.नि.हजरत पठाण यांची दोन पथके तयार करुन तळेगाव दाभाडे परीसरात रवाना करण्यात आली.

दुसरी कारवाई :- पो.उ.नि. अशोक जगताप यांचे पथकाने निलया नाईकनवरे सोसायटी, तळेगाव दाभाडे ता. मावळ, जि. पुणे येथून इसम नामे ओमकार ऊर्फ बंटी दत्ता आसवले वय २० वर्षे, रा. मु.पो.टाकवे बुाा, भैरवनाथ मंदीराजवळ, ता. मावळ, जि. पुणे यास ताब्यात घेवून त्याचेकडुन ५१,०००/- रु. चे ०१ गावठी पिस्तुल व ०२ जिवंत काडतुसे हस्तगत करुन त्याचे विरोधात तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्रमांक ३२३/२०२४ भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३,२५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपींस मा. प्रथमवर्ग न्यास दंडाधिकारी सो. वडगाव न्यायालय, ता. मावळ जि. पुणे यांचे न्यायालयात हजर करुन त्यांची तपासकामी दि.२६/०६/२०२४ रोजी पर्यंत ०४ दिवस पोलीस कस्टडीची रिमांड घेण्यात आली आहे.

तिसरी कारवाई :- पो.उप.निरी. हजरत पठाण यांचे पथकाने तपोधान कॅालनी गार्डन, पाण्याची टाकी जवळ, वराळे रोड, तळेगाव, पुणे येथुन संशयीतरित्या थांबलेल्या १. समर्थ संभाजी तोरणे, वय १९ वर्षे, रा. रिध्दीसिध्दी बिल्डींग, फलॅट नं २, कात्रज तलावजवळ, कात्रज, पुणे २. अमन मेहबुब शेख, वय १९ वर्षे, रा. काकडेवस्ती गल्ली नं. २, सर्वे नं ४, कोंढवा, पुणे यांना ताब्यात घेवून त्यांचे कब्जातुन १,५२,०००/- रु. चे ०३ देशी बनावटीचे पिस्तुले व ०४ जिवंत काडतुसे हस्तगत करुन तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्रमांक ३२४/२०२४ भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३,२५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपींस मा. प्रथमवर्ग न्यास दंडाधिकारी सो. वडगाव न्यायालय, ता. मावळ जि. पुणे यांचे न्यायालयात हजर करुन त्यांची तपासकामी दि.२६/०६/२०२४ रोजी पर्यंत ०४ दिवस पोलीस कस्टडीची रिमांड घेण्यात आली आहे. सदरची कारवाईमध्ये पोहवा/ २०२९ मेदगे, पोना/ १७२९ शामबाबा यांनी तांत्रिक विश्लेषणाची विशेष कामगिरी केली आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त श्री. सुनिल रामानंद सो, मा. अपर पोलीस आयुक्त डॉ. श्री. वसंत परदेशी सो., पोलीस उप आयुक्त (गुन्हे) संदीप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील, पोलीस उप निरीक्षक अशोक जगताप, हजरत पठाण, पोलीस अंमलदार :- प्रविण तापकिर, सोपान ठोकळ, विक्रम जगदाळे, गंगाराम चव्हाण, गणेश मेदगे, विजय गंभिरे, सुनिल चौधरी, मयुर दळवी, नितीन गेंगजे, शाम बाबा, विजय तेलेवार, शुभम कदम, रामदास मोहीते, ज्ञानेश्वर गिरी, तौसिफ शेख, व TAW कडील नागेश माळी व पोपट हुलगे यांनी केली आहे.

(संदीप डोईफोडे)
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय